दि. १५/०२/२०२१

—: प्रेसनोट :—

यातील फिर्यादी यांचे दुकानाच्या साईन बोर्ड संदर्भात बृहन्मुंबई महानगर पालिका येथे कारवाई न करण्याकरीता यातील आलोसे यांनी फिर्यादीकडे रु.२,२५,०००/— रक्कमेची लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती रु.६०,०००/—लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | ०६/२०२१ |
| कलम | ७, १२ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) श्री.नितीन गणपत पाटणकर, वय ४९, पद — निरीक्षक, अनुज्ञापन विभाग म.न.पा., पी/नॉर्थ वार्ड, मालाड (पश्चिम), मुंबई<br>२) श्री.हरिश्चंद्र नानाभाऊ घेगडमल, वय ५३ वर्षे, पद—निरीक्षक, अनुज्ञापन विभाग, म.न.पा., पी/नॉर्थ वार्ड, मालाड (पश्चिम), मुंबई<br>३) श्री.सुदेश कलथ्थूर पॉल,वय ४१ वर्षे —खाजगी इसम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु.२,२५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ६०,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे चारकोप परिसरात रहात असुन, त्याच्या दुकानाच्या साईन बोर्ड संदर्भात कारवाई न करण्याकरीता आलोसे क्र. १ व २ यांनी फिर्यादीकडे रु.२,२५,०००/— रक्कमेची लाचेची मागणी केली.<br>सदरची रक्कम फिर्यादीस लोकसेवक यांना दयावयाची नसल्याने फिर्यादीने दिनांक ११/०२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे प्रत्यक्ष येवून, लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन दिनांक ११/०२/२०२१ रोजी पडताळणी केली असता, आलोसे क्र. १ व २ यांनी फिर्यादी यांच्या दुकानाच्या साईन बोर्ड संदर्भात कारवाई न करण्यासाठी तडजोडीअंती रू. ६०,०००/— रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन आज दि.१५/०२/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ व २ यांनी रु.६०,०००/— लाचेची रक्कम मागणी करून आलोसे क १ याने आरोपी क ३ या खाजगी इसमाकडे लाचेची रक्कम देण्यासाठी सांगितलेवरून आरोपी क ३ यांनी लाचेची रक्कम स्विकारली असता दोन लोकसेवक व एक खाजगी इसम यांस रंगेहात पकडण्यात आले आहे. |

( आबासाहेब पाटील )
सहायक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क. १०६४